## निशाणी ३२ खालील आदेश

१. प्रस्तुत अर्ज प्रतिदाव्यातील वादी (मूळ दाव्यातील प्रतिवादी नं.४) यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ३९ नियम १ व २ मधील तरतुदीनुसार दाखल केला आहे.

२. मिळकतीचे वर्णन–मौजे होळ, ता. केज येथील स.नं.३१०/ई/५ यासी क्षेत्रफळ ०० हे. २१ आर पैकी वादग्रस्त क्षेत्र ०० हे. ०४ आर ज्याची चतुःसिमा पूर्वेस उषा केशव राख, पश्चिमेस व्यंकटी सिताराम शिंदे, दक्षिणेस ग्रामपंचायत रस्ता व उत्तरेस विमल हाके, ही मिळकत वादग्रस्त असून सदर मिळकतीस यापुढे सोयीकरिता 'वादग्रस्त मिळकत' असे संबोधण्यात आलेले आहे. तसेच, सोयीकरिता मूळ दाव्यातील प्रतिवादी नं.४ यांना प्रस्तुत अर्जाकामी 'वादी' व मूळ दाव्यातील वादी यांना 'प्रतिवादी' असे संबोधण्यात आलेले आहे.

३. वादींचे कथनानुसार, वादीचे पती महादेव रामकिसन राख हे दिनांक ३०.११.१९९७ रोजी मयत झालेले असून त्यांच्या मृत्यूनंतर वादीच्या नावे दिनांक ०८.०८.२००० रोजीच्या वारसा फेरफार क्रमांक २७४०/१५४ आधारे वादग्रस्त मिळकत आलेली आहे. सदर मिळकतीबाबत वादीच्या नावे महसूल अभिलेखात नोंद झाली व अद्याप कायम आहे. सन २००० पासून वादग्रस्त मिळकतीची मालक व ताबेदार नात्याने काबीज राहून उपभोग घेत आलेली आहे व घेत आहे. वादी ही वादग्रस्त मिळकतीची कायदेशीर मालक व ताबेदार असल्याचे प्रतिवादीस परिपूर्ण कल्पना असताना प्रतिवादीने जाणून बुजून वादीची जमीन हडप करणेकामी दुष्ट हेतूने वादीविरुद्ध दिनांक १८.१२.२०२१ रोजी खोटा व बनावटी दावा न्यायालयात दाखल केला तसेच दिनांक १२.१२.२०२१ रोजी खोटी व बनावटी एन.सी. दाखल केली. प्रतिवादीने दिनांक २५.१२.२०२१ रोजी वादग्रस्त मिळकतीत येऊन वादीस, 'या जमिनीवरील ताबा तुम्ही सोडा', असे म्हणून वादीची वादग्रस्त मिळकतीवरील मालकी नाकारली म्हणून वादीस प्रस्तुत प्रतिदावा देण्याचे कारण घडले आहे.

४. वादींचे पुढील कथनानुसार, वादी वादग्रस्त मिळकतीची मालक व ताबेदार आहे. प्रतिवादी गुंड व आडदांड असून त्यांचेकडे अधीक मनुष्यबळ असल्याचा गैरफायदा

घेऊन वादग्रस्त मिळकत हडप करण्याच्या उद्देशाने वादीचे ताबे कब्जे उपभोगास ऐन केन प्रकारे रोखठो, हरकत अडथळा निर्माण करत आहे व वादीस बेदखल करण्याचा प्रयत्न करीत आहे. जर प्रतिवादीने वादीस वादग्रस्त मिळकतीतून बेदखल केले तर वादीचे कशानेही भरुन न येणार असे अतोनात नुकसान होईल व वादीस अनेक प्रकरणांना सामोरे जावे लागेल. वादीने प्रस्तुत अर्जाचे कलम १४ मध्ये दर्शविलेल्या नकाशातील क्षेत्राप्रमाणे वादीचा वादग्रस्त मिळकतीवर ताबा, कब्जा असून आजतागायत उपभोग घेत आहे. वादीचे हक्कात प्रथमदर्शनी केस असून न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे. त्यामुळे दाव्याचा अंतीम निकाल लागेपर्यंत प्रतिवादीने वादग्रस्त मिळकतीवरील ताबे कब्जे उपभोगास स्वतः व इतरांमार्फत हरकत अडथळा करु नये असा तुर्तातूर्त मनाई हुकूम वादीचे हक्कात व प्रतिवादीचे विरुद्ध होणे योग्य व न्याय्य आहे. करिता, अर्ज मंजूर करण्यात यावा.

५. प्रतिवादीने निशाणी क्रमांक ३७ वर जबाबदावा व म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार, वादीने प्रस्तुत अर्जाचे कलम नं.३ मध्ये दर्शविलेली वंशावळ चूक आहे असून प्रतिवादीस मान्य नाही. तसेच कलम नं.४ मध्ये दर्शविलेले ००.०४ गुंठे क्षेत्र व चतुःसिमा चुकीच्या दाखवलेल्या आहेत. प्रतिवादीने प्रस्तुत अर्जाचे कलम नं. ५ ते १३ मधील संपूर्ण मजकूर नाकारलेला असून तो प्रतिवादीस मान्य नाही. उलटपक्षी वादी व त्यांचे नातेवाईक हे गुंड प्रवृत्तीचे असून प्रतिवादीचे पती भोळसर असल्याचा फायदा घेऊन व त्यांना कोणाचा आधार नसल्याने प्रतिवादीची मूळ दाव्यातील वादग्रस्त जमीन हडप करण्यासाठी वादी प्रतिवादीस त्रास देतात. तसेच प्रतिवादीच्या जमिनीमध्ये वादीच्या भावाने अतिक्रमण घर बांधण्यास सुरुवात केली. त्यावेळी प्रतिवादीने त्यांना माझ्या जागेत बांधकाम करु नका असे म्हणताच वादी व त्यांच्या नातेवाईकांनी प्रतिवादीस मारहाण केल्यामुळे प्रतिवादीने एस.पी.ऑफीस, बीड येथे अर्ज दिला. वादी व त्यांचे नातेवाईक गुंड व आडदांड प्रवृत्तीचे असून प्रतिवादी जमिनीमधून बेदखल करण्याच्या प्रयत्नात आहेत.

६. प्रतिवादींचे पुढील कथनानुसार, वादीने प्रस्तुत अर्जाचे कलम नं.१४ मध्ये दर्शविलेला नकाशा चूक, खोटा, काल्पनीक व बनावट आहे. वादीच्या नकाशात

दर्शविल्याप्रमाणे वादीच्या मुलाचे वेगळे घर नाही, वादीची मोकळी जागा नाही व प्रतिवादीने मोहन राख, शेषेराव राख व बाळासाहेब राख यांना जमीन विक्री केलेली नाही. तसेच वादीने प्रतिदाव्यासोबत दाखल केलेल्या पी.टी.आर हया खोट्या व बनावट आणि बिनबुडाच्या आहेत. करिता, अर्ज खर्चासह खारीज करण्यात यावा.

७. दोन्ही पक्षांच्या परस्पर कथनांच्या आधारे खालील मुद्दे निष्कर्षासाठी उपस्थित झाले, त्यांना त्याखालील कारणांसह निष्कर्ष दिलेले आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादींच्या बाजूने प्रथमदर्शनी प्रकरण आहे काय? | होकारार्थी |
| २. | न्यायाचा समतोल वादींचे बाजूने आहे काय? | होकारार्थी |
| ३. | अर्ज नामंजूर केल्यास वादींचे अपरिमीत नुकसान होईल काय? | होकारार्थी |
| ४. | काय आदेश? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

८. वादींतर्फे दाखल निशाणी २५ व ४१ लगत तसेच प्रतिवादींतर्फे निशाणी ४ लगत दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद विचारात घेतला. न्यायालयीन अभीलेखाचे अवलोकन केले.

**मुद्दे क्रमांक १ ते ३ बाबत :**

९. सदर मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने व त्यावर एकत्रीत पुरावा आलेला असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रात चर्चिले आहेत. तूर्तातूर्त मनाईच्या अर्जावर निर्णय देताना प्रथमदर्शी बाजू, अनुकूलतेचा कल व अपरिमीत नुकसान होणार काय एवढेच पाहणे गरजेचे असते. तूर्तातूर्त आदेशाचा फायदा मिळविण्यासाठी संबंधीत पक्षकाराने त्यांच्या मागणीमध्ये कायद्याचे समन्याय तत्व दाखवून देणे गरजेचे असते.

१०. वादींतर्फे विधीज्ञ श्री. एस. एस. गिरी यांनी असा युक्तीवाद केला, की वादीचे पती महादेव रामकिसन राख हे दिनांक ३०.११.१९९७ रोजी मयत झालेले असून त्यांच्या मृत्यूनंतर वादीच्या नावे दिनांक ०८.०८.२००० रोजीच्या वारसा फेरफार क्रमांक २७४०/१५४ आधारे वादग्रस्त मिळकत आलेली आहे. सन २००० पासून वादग्रस्त मिळकतीची मालक व ताबेदार नात्याने काबीज राहून उपभोग घेत आलेली आहे व घेत आहे. याची पूर्ण कल्पना असताना प्रतिवादीने वादीची जमीन हडप करणेकामी दुष्ट हेतूने वादीविरुद्ध खोटा दावा दाखल केला. प्रतिवादीने वादीची वादग्रस्त मिळकतीवरील मालकी नाकारली म्हणून वादीस प्रस्तुत अर्ज देण्याचे कारण घडले आहे. प्रतिवादीने वादीस वादग्रस्त मिळकतीतून बेदखल केले तर वादीचे कशानेही भरुन न येणारे नुकसान होईल. वादीचे हक्कात प्रथमदर्शनी केस असून न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे. त्यामुळे दाव्याचा अंतीम निकाल लागेपर्यंत प्रतिवादीने वादग्रस्त मिळकतीवरील ताबे कब्जे उपभोगास स्वतः व इतरांमार्फत हरकत अडथळा करु नये असा तुर्तातूर्त मनाई हुकूम प्रतिवादीचे विरुद्ध होणे योग्य व न्याय्य आहे. करिता, अर्ज मंजूर करण्यात यावा.

११. याउलट प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्रीमती ए. आर. मुंडे यांनी असा युक्तीवाद केला, की अर्जातील कलम नं.४ मध्ये दर्शविलेले ००.०४ गुंठे क्षेत्र व चतु:सिमा चुकीच्या दाखवलेल्या आहेत. वादी व त्यांचे नातेवाईक हे गुंड प्रवृत्तीचे असून प्रतिवादीचे पती भोळसर असल्याचा फायदा घेऊन व त्यांना कोणाचा आधार नसल्याने प्रतिवादीची मूळ दाव्यातील वादग्रस्त जमीन हडप करण्यासाठी व प्रतिवादी वादग्रस्त मिळकत सोडून जावे या उद्देशाने त्रास देतात तसेच प्रतिवादीच्या जमिनीमध्ये वादीच्या भावाने अतिक्रमण घर बांधण्यास सुरुवात केली. त्यावेळी प्रतिवादीने त्यांना माझ्या जागेत बांधकाम करु नका असे म्हणताच वादी व त्यांच्या नातेवाईकांनी प्रतिवादीस मारहाण केल्यामुळे प्रतिवादीने एस.पी.ऑफीस, बीड येथे अर्ज दिला. अर्ज खोटा असून तो मंजूर केल्यास प्रतिवादींचे नुकसान होणार आहे. करिता, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

१२. वादींची प्रतिवादींविरुद्ध हरकत अडथळा करु नये, म्हणून तुर्तातूर्त मनाई हुकूमाची मागणी आहे. याकरिता, वादींनी वादग्रस्त मिळकतीवर ताबा असल्याचे प्रथमदर्शनी सिद्ध करणे आवश्यक आहे. वादींच्या कथनानुसार, वादीचे पती महादेव रामकिसन राख हे दिनांक ३०.११.१९९७ रोजी मयत झालेले असून त्यांच्या मृत्यूनंतर

वादीच्या नावे दिनांक ०८.०८.२००० रोजीच्या वारसा फेरफार क्रमांक २७४०/१५४ आधारे वादग्रस्त मिळकत आलेली आहे. सदर मिळकतीबाबत वादीच्या नावे महसूल अभिलेखात नोंद झाली व अद्याप कायम आहे. त्याकरिता प्रतिवादींतर्फे दाखल निशाणी २७ वरील दाखल गट नं.३१०/ई/५ चा सातबारा उतारा पाहिला असता, त्यावर ००.०४ आर करिता वादींच्या नावाची नोंद आढळून येते. त्यामुळे वादींचे कथन विश्वास संपादन करते व वादी वादग्रस्त मिळकतीच्या वहितीमध्ये असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. याउलट प्रतिवादींचे कथनानुसार, वादीच्या नावावरील ००.०४ गुंठे क्षेत्र व चतुःसिमा चुकीच्या दाखवलेल्या आहेत. सदर बाब सिद्ध करणेकामी प्रतिवादीतर्फे कोणताही पुरावा दाखल नाही.

१३. त्याचबरोबर, महसूल अधिनियम कलम १५७ नुसार हक्क नोंदीतील नोंदी जोपर्यंत नाशाबीत होत नाहीत, तोपर्यंत त्या ख-या असल्याचे गृहीत धरावयाचे आहे. तसेच, भक्कम साक्षी पुराव्याच्या आधारे जेव्हा गृहीत धरलेले हे सत्य नाशाबीत होईल तेव्हा या नोंदीची पुरावा म्हणून किंमत शून्य होते. वादग्रस्त मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर ००.०४ आर क्षेत्राकरिता वादींच्या नावाची नोंद दिसून येते. सदर नोंद नाशाबित करणेकामी प्रतिवादीने कोणताही सबळ अथवा ठोस पुरावा पटलावर दाखल केलेला नाही. त्यामुळे, वादग्रस्त मिळकतीवर ताबा असल्याची बाब सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्यानिशी वादींनी सिद्ध केल्याचे दिसून येते.

१४. थोडक्यात, वरील सर्व बाबी व न्यायालयीन अभिलेख पाहता, वादग्रस्त मिळकतीवर ताबा असल्याची बाब वादींनी प्रर्थमदर्शनी सिद्ध केली असल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर मिळकतीत उपभोग घेण्यास प्रतिवादींनी हरकत अडथळा केल्यास वादींचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रतिवादींविरुद्ध मनाई हुकम आदेश पारित करणे सद्यस्थीतीत योग्य व संयुक्तीक वाटते. याउलट प्रतिवादीविरुद्ध मनाई हुकूम दिल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे दिसून येते. करिता, मुद्दे क्रमांक १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदविण्यात आले असून मुद्दा क्रमांक ४ च्या अनुषंगाने खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज निशाणी ३२ मंजूर करण्यात येतो.

२. दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादीने गट नं.३१०/ई/५ मधील ००.०४ आर मिळकतीतील वादीच्या शांततामय कब्जे वहिवाटीस स्वतः अगर इतरांमार्फत रोकठोक अडथळा करु नये, असा तूर्तातूर्त मनाई हुकूम प्रतिवादींविरुद्ध देण्यात येतो.

३. खर्चाबाबत आदेश मूळ दाव्याचे कामी पारीत करण्यात येतील.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by MANISHA NAMDEO THORAT
Date: 2022.03.30 11:23:03 +0530

(मनिषा ना. थोरात)

दि. ३०.०३.२०२२ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, केज

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file are word to word same as per original Judgment/Order.

Dictated on : 30.03.2022

Transcribed on : 30.03.2022

Checked and signed on : 30.03.2022

Sd/-
(Hanumant B. Suryawanshi)
Steno Grade-II
Jt. CJJD & JMFC Court, Kaij